**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-२७३०/२०२४**

**अपिलार्थी, श्री.राजेश रविलाल शहा,**
**६०२, रत्नदिप बिल्डींग, विष्णुनगर, १९ नं.शाळे जवळ,**
**नौपाडा, ठाणे, जि.ठाणे ४०० ६०२.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक,
नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका,
ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,
पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त,
नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका,
ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,
पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : २२.७.२०२५

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ४.४.२०२४ | ----- | २२.५.२०२४ | २४.६.२०२४ |

अपिलार्थी यांनी दि.२९.७.२०२४ रोजीच्या अर्जान्वये "अपेक्षित माहिती दिलेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २२.७.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. प्रविण भोईर, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. सोपान भाईक, सहाय्यक आयुक्त, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" (टिका नं. १६ सिटी सर्वे क्र. ७३, मोजे नौपाडा, संभाजीपथ आराधना इमारत व पार्वती इमारत घंटाळी चौक, ठाणे येथील मंजूर विकास प्रस्ताव क्र. S०२/०३२३/२१ सदर ठिकाणी नियमाबाहय काम चालू आहे त्याबाबत तक्रार त्या अनुषंगाने ठा.म.पा./मुख्या-१/शविवि-२९/६८४२, दि.१२.०३.२०२४ याची माहिती देण्यात यावी) "*

*विषयांकित संदर्भात सहायक आयुक्त, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठा.म.पा. यांनी कारवाई करण्यात आलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रती देण्यात यावी. तसेच प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असल्यास पाहणी अहवाल, फोटो पंचनामा इत्यादीच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात. तसेच मालक, विकासक व वास्तुविशारद व इतर यांना या विषयांकित संदर्भानुसार संबंधितांना नोटीस दिलेली असले तर त्याच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात.*

*तसेच संबंधित मालक, वास्तुविशारद व विकासक यांनी कोपरी प्रभाग समिती, सहायक आयुक्त यांच्या नोटीसीवर खुलासा दिलेला असेल तर त्याच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात.*

*संबंधित विकासक, मालक, वास्तुविशादर विषयांकित संदर्भानुसार कोर्टात जाण्यासाठी स्थगिती घेतलेली असेल तर त्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "समाधानकारक माहिती दिलेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, “पुनश्चः अभिलेख तपासून उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांचे आत अपिलार्थी यांना विनामूल्य देण्यात यावी. जी माहिती दप्तरी उपलब्ध नाही, त्याबाबत मुद्देसुद स्पष्टीकरणासह कारणमीमांसा कळविण्यात यावे.” असे आदेश पारित करून अपिल निकाली काढले आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्याप माहिती मिळाली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.

आनंद पाटील, कार्यालयीन अधिक्षक यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती ,ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी **अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ४.४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.२३.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२३.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ जुलै, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, कार्यालयीन अधिक्षक,
नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका,
ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी, पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२.

**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. प्रविण भोईर, कार्यालयीन अधिक्षक,
नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका,
ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,
पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२ **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक : के.आर-२७३०/२०२४**
**अपिलार्थी, श्री.राजेश रविलाल शहा,**
**सुनावणी दिनांक २३.९.२०२५** (In continuation of order dt. २२.७.२०२५)

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. तथापि, आयोगाच्या आदेशानंतरही अपिलार्थी यांना माहिती देण्यात आली नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती यांनी त्यांचा लेखी खुलासा पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना आयोगाच्या दि.२२.७.२०२५ रोजीच्या आदेशानुसार लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश पारित केले होते. त्या अनुषंगाने त्यांनी दि.२३.९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास लेखी खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, उपरोक्त संदर्भातील माहिती अधिकार अर्ज त्यांच्याकडे दि.४.४.२०२४ रोजी प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध नस्तींची तपासणी करून अर्जदार यांनी केलेली माहितीची मागणीची नोंद तपासणी अंती दिसून आलेली नसल्याचे संबंधित विभागाकडून आपणास कळविण्यात आले व त्याप्रमाणे आपण माहिती जा.क्र.ठामपा/नौप्रस./कार्या-अ/अति.वि/६३ दिनांक २.५.२०२४ रोजी पत्र तयार करून अतिक्रमण विभागातील लिपिक कर्मचारी श्री. महाकाल व सौ. नमिता चव्हाण यांना माहिती मुदतीत देण्यासाठी सूचना केल्या. त्याबाबत दि.४.३.२०२४ रोजीच्या आदेशानुसार जिल्हाकारी यांचे आदेशान्वये १४८ ठाणे विधानसभा मतदार संघ या लोकसभेच्या निवडणुकीच्या स्वीप अंमल बजावणी पथ या पथकामध्ये केल्याने आपण त्वरीत या कामासाठी हजर झालो.

मार्च २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालाधीमध्ये निवडणुकीचे कामकाज करत असताना नौपाडा-कोपरी प्रभाग समिती कडील अधिनस्त विविध कर्मचा-यांनासुध्दा BLO व इतर निवडणूक काम देण्यात आले होते. पंरतु, त्यांनरसुध्दा आपण जसा वेळ मिळेल त्याप्रमाणे कार्यालयात जाऊन अधिनस्त कर्मचा-यांना माहिती अधिकार अंतर्गत आलेल्या अर्जावर वेळेत व त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना देत होतो.

आपल्या लेखी खुलाशामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना विहित मुदतीत व वेळेत माहिती देण्यात आलेली नाही हे जरी खरे असले तरी त्यांनी मागणी केलेली माहिती दप्तर तपासणी करूनसुध्दा उपलब्ध नसल्याचे यापूर्वीच्या संदर्भीय पत्रानुसार कळविण्यात आले आहे. व त्याबाबतचा अहवाल द्वितीय अपिलाच्या निर्णयाला अधिन राहून आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार विद्यमान कार्यालयीन अधिक्षक तथा जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.२.२०२५ रोजी अहवाल आयोगास सादर केलेला आहे. त्यांनी पुढे असेही निदर्शनास आणले की, त्यांची सदर कार्यालयाकडे एकूण ७ महिने सेवा झालेली असून त्यापैकी ५ महिने सेवा ही जिल्हाधिकारी कार्यालय निवडणूक कार्यक्रमासाठी झालेली आहे. या एकंदरीत परिस्थितीचा विचार करून आपल्यावर शास्ती लादण्यात येऊ नये अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी दिलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता त्यांनी वेळेत माहिती देण्याच्या सूचना अतिक्रमण विभागातील लिपिक कर्मचारी श्री. महाकाल व सौ. नमिता चव्हाण यांना दिल्या होत्या. सबब, अतिक्रमण विभागातील लिपिक कर्मचारी श्री. महाकाल व सौ. नमिता चव्हाण यांनी त्यांचा लेखी खुलासा आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या खुलाशावर निर्णय घेण्यात येईल. तत्पूर्वी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने दि.२२.७.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने कार्यवाही करावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती ,ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी आयोगाच्या दि.२२.७.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी अपिलार्थी यांना वेळेत माहिती देण्याच्या सूचना अतिक्रमण विभागातील लिपिक कर्मचारी श्री. महाकाल व सौ. नमिता चव्हाण यांना दिल्या होत्या. **सबब, अतिक्रमण विभागातील लिपिक कर्मचारी श्री. महाकाल व सौ. नमिता चव्हाण यांनी त्यांचा लेखी खुलासा आयोगाकडे दि.६.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करावा. श्री. महाकाल व सौ. नमिता चव्हाण यांचा लेखी खुलासा प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या खुलाशावर निर्णय घेण्यात येईल.**

३.  **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि. ६.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २३ सप्टेंबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
श्री. महाकाल, लिपिक व सौ. नमिता चव्हाण, लिपिक,
अतिक्रमण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,
पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२

**-यांना प्रत**
श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे,
महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,
पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२ **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक : के.आर-२७३०/२०२४**
**अपिलार्थी, श्री.राजेश रविलाल शहा,**
**सुनावणी दिनांक २५.११.२०२५ (In continuation of order dt.२३.९.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, (सेवानिवृत्त), कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, यांनी असे निवेदन केले की, आयोगाच्या दि.२३.९.२०२५ रोजीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे श्री. महाकाल, लिपिक, अतिक्रमण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे हे दि.३.९.२०२५ रोजी मृत्यू पावले आहेत. तसेच सौ. नमिता चव्हाण, लिपिक, अतिक्रमण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे या प्रसुती रजेवर असल्याने त्यांचा लेखी खुलासा प्राप्त झालेला नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, (सेवानिवृत्त), कार्यालयीन अधिक्षक यांनी केलेला खुलासा पाहता कोणताही आधार दिसून येत नाही. वास्तविक अर्जदारांना माहिती देण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांचे असते ते काम त्यांनी केलेले नाही. त्यासाठी त्यांनी श्री. महाकाल, लिपिक व सौ. नमिता चव्हाण, लिपिक, अतिक्रमण विभाग या ज्या लिपिकांचा उल्लेख तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, (सेवानिवृत्त), कार्यालयीन अधिक्षक यांनी केला आहे त्यापैकी एक मृत्यू पावले आहेत तर दुस-या प्रसुती रजेवर आहेत. अशा परिस्थितीत अपिलार्थीस माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, (सेवानिवृत्त), कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती हे जबाबदार असल्याचे दिसून येते. सबब, त्यांचा खुलासा अमान्य करणे उचित होईल.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनीही अद्यापपर्यंत अपिलार्थीना माहिती दिली नाही. आयोगाने दि.२२.७.२०२५ रोजी १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने माहिती देण्याचे आदेश दिले होते. तथापि, त्या आदेशाची पूर्ततादेखील विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी केलेली नाही. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी आयोगाच्या दि.२२.७.२०२५ रोजीच्या आदेशानंतरही अपिलार्थीस अद्याप माहिती दिली नसल्याने त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन अधिक्षक यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, (सेवानिवृत्त), कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून त्यांचा दिनांक २३.९.२०२५ रोजीचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना दि.२२.७.२०२५ च्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.२५,००० (अक्षरी रु.पंचवीस हजार रूपये फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचेकडून **१०** मासिक हप्त्यात वसूल करुन राष्ट्रीयकृत बँकेत **किंवा** कोषागार कार्यालयात लेखाशीर्ष क्र. ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली चलन भरून रोखीने **किंवा** धनादेशाव्दारे जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल (रक्कम जमा केलेल्या चलनाच्या छायांकित प्रतीसह व्दितीय अपील क्रमांक स्पष्ट नमूद करून) **उपायुक्त (सामान्य प्रशासन विभाग), ठाणे महानगरपालिका, ठाणे** यांनी आयोगास तात्काळ सादर करावा.

**२.** विद्यमान जन. माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ४.४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या आदेशानंतरही माहिती दिली नसल्याने **त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.१३.१.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.१.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २५ नोव्हेंबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, ५ वा मजला,
दालन क्र. ५२७/५२८, कोंकण भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

२. उप आयुक्त (सा.प्र), सामान्य प्रशासन विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,
पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२.

३. आहरण व संवितरण अधिकारी/मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लेखा विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,
पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आनंद पाटील, (सेवानिवृत्त) कार्यालयीन अधिक्षक,
नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका,
ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी, पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२.

**-यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन अधिक्षक,
नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका,
ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,
पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२ **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक : के.आर-२७३०/२०२४**
**अपिलार्थी, श्री.राजेश रविलाल शहा,**
**सुनावणी दिनांक २४.२.२०२६ (In continuation of order dt.२५.११.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, (सेवानिवृत्त), कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, (सेवानिवृत्त), कार्यालयीन उपअधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी दि.२३.२.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, राजेश रविलाल शहा यांना मूळ नस्ती तपासणीकरीता उपलब्ध करून देण्यात आली होती. परंतु त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांना हवी असलेली माहिती ही त्या नस्तीमध्ये उपलब्ध नाही असे त्यांनी सांगितले. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती जा. क्र.ठामपा/नौप्रस/कार्या.अ/अतिवि/६३ दि.२.५.२०२४ रोजी तयार केलेली माहिती, माहिती अधिकार प्रत्येक सुनावणीच्या वेळी त्यांना देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, त्यांनी ती घेण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे त्यांचेवर शास्ती आकारण्याची कारवाई करू नये अशी आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी या संदर्भात असे निवेदन केले की, श्री. सुनिल पाटील, कार्यकारी अभियंता, शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी त्यांचे पत्र क्र. ठा.म.पा./मुख्या-१/शविवि-२९/६८४२, दि.१२.०३.२०२४ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांचा अर्ज सहा. आयुक्त, नौपाडा-कोपरी प्रभाग समिती यांचेकडे पाठविला असून त्यावर कारवाई करण्यासंदर्भात निर्देश दिले होते. या पत्राच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीची माहिती अपिलार्थींनी मागितली आहे. त्यामुळे ही माहिती उपलब्ध असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असा युक्तिवाद अपिलार्थी यांच्या प्रतिनिधींतर्फे करण्यात आला.

अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांचा युक्तिवाद पटण्यासारखा आहे. कारण कार्यकारी अभियंता यांच्या पत्रावरील आवक शिक्क्यानुसार सदर पत्र सहाय्यक आयुक्त, नौपाडा-कोपरी प्रभाग समिती यांना प्राप्त झाले आहे. तर या संदर्भातील माहिती उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी कोणत्या आधारावर विधान करतात हे स्पष्ट होत नाही किंवा त्या संदर्भात कोणताही खुलासा जन माहिती अधिकारी यांनी केलेला नाही.

कार्यकारी अभियंयता यांचे हे पत्र प्राप्त झाले असल्यामुळे या संदर्भात दोन शक्यता असू शकतात. एक तर या पत्राच्या अनुषंगाने नौपाडा कोपरी प्रभाग समितीने कार्यवाही केली असेल किंवा दुसरी शक्यता म्हणजे त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नसेल. या दोन्हीही परिस्थितीमध्ये जी काही वस्तुस्थिती असेल त्याबाबतची माहिती अपिलार्थी यांना मिळणे आवश्यक होते. तशी ती विहित मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिली नाहीच. परंतु, आयोगाने आदेश दिल्यानंतर ही माहिती देण्यास टाळाटाळ होत आहे व त्याचा खुलासा करताना माहिती उपलब्ध नाही असे बिनधास्तपणे जन माहिती अधिकारी नमूद करत आहेत. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन उपअधिक्षक यांचा खुलासा मान्य करणे शक्य होत नाही.

असे जरी असले तरी अद्यापपर्यंत अपिलार्थींना माहिती प्राप्त झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. दोन जन माहिती अधिकारी आतापर्यंत माहिती देण्यास अयशस्वी ठरले असल्याने सहाय्यक आयुक्त, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी पुढील १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती प्राप्त होईल याची खात्री करावी व अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याबाबतचे शपथपत्र त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करावे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन उपअधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून त्यांचा दि.२३.२.२०२६ रोजीचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना दि.२५.११.२०२५ च्या आदेशात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचवेर माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.२५,०००/- (अक्षरी रु. पंचवीस हजार रुपये फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचेकडून १० समान मासिक हप्त्यात वसूल करुन राष्ट्रीयकृत बँकेत **किंवा** कोषागार कार्यालयात लेखाशीर्ष क्र. ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली चलन भरून रोखीने **किंवा** धनादेशाव्दारे जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल **उपायुक्त (सामान्य प्रशासन विभाग), ठाणे महानगरपालिका, ठाणे** यांनी आयोगास सादर करावा.

२. **सहाय्यक आयुक्त, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी पुढील १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती प्राप्त होईल याची खात्री करावी व अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याबाबतचे शपथपत्र त्यांनी आयोगाकडे दि.१६.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करावे.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१६.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र. ५२७/५२८, कोंकण भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
२. उप आयुक्त (सा.प्र), सामान्य प्रशासन विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी, पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२.
३. आहरण व संवितरण अधिकारी/मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लेखा विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी, पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२.
४. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. जयनाथ माळी, कार्यालयीन अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी, पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२ **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक : के.आर-२७३०/२०२४**

**अपिलार्थी, श्री.राजेश रविलाल शहा,**

**सुनावणी दिनांक १६.४.२०२६ ( In Continuation of order dt.२४.२.२०२६)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी तसेच विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. ज्योती राजेश मानपुरे, प्र. कार्यालयीन उप अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे या उपस्थित आहेत.

या प्रकरणी सहाय्यक आयुक्त, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे हे आजच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यांचे वतीने विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. ज्योती राजेश मानपुरे, प्र. कार्यालयीन उप अधिक्षक, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे या उपस्थित आहेत.

श्री. बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त, नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी आयोगास जे शपथपत्र सादर केलेले आहे ते त्यांनी कार्यकारी दंडाधिकारी किंवा नोटरी यांच्यासमोर साक्षांकित केले नसल्याने ते स्वीकारता

येत नाही. सदरचे शपथपत्र त्यांनी कार्यकारी दंडाधिकारी किंवा नोटरी यांचेसमोर साक्षांकित करून पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**श्री. बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त,**
**नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका,**
**ठाणे, महापालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,**
**पाचपाखाडी, जि.ठाणे ४०० ६०२.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ